# मेळघाटातील
# कोरकूंची लोकसंस्कृती

डॉ. विलास तायडे

Prashant

प्रशांत पब्लिकेशन्स

**मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती**
Melghatatil Korkunchi Loksanskruti
By Dr. Vilas Tayade

© सौ. सुरेखा विलास तायडे
'विश्वजित' श्री कॉलनी, एम.आय.डी.सी.रोड, आकोट.
मोबाईल : 9421793296

**प्रकाशक । मुद्रक**
रंगराव पाटील
प्रशांत पब्लिकेशन्स
3, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,
जळगाव 425001.

**दूरध्वनी । वेब । ईमेल**
0257-2235520,2232800
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

**आवृत्ती । आयएसबीएन । किंमत**
पहिली आवृत्ती डिसेंबर 2019
978-93-89492-70-5
₹ 125/-

**मुखपृष्ठ**
बळी खैरे

**अक्षरजुळवणी**
प्रविण राऊत

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक/प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

## ।। अर्पणपत्रिका ।।

आयुष्यभर आपल्या मुलांसाठी
कष्ट करणारी व माझ्यावर
अविरत प्रेम करणारी
माझी आई लक्ष्मीबाईस...
अर्पण!

# प्रस्तावना

'मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती' प्रा.डॉ. विलास तायडे यांनी या ग्रंथात कोरकूंची जीवनसंस्कृती आणि लोकसाहित्यामधील भावभावना आणि प्रथापरंपरामागील धारणांचा मागोवा घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. नव्या अभ्यासकांची पिढी आदिवासी जीवन-संस्कृतीत रस घेते. ही एक आनंदपर्वणी म्हणावी लागेल. ही त्यांच्या भविष्यातील सक्षम लेखनाची नांदी आहे.

कोरकू बोली-भाषा समजायला अवघड आहे. त्यात बोलीला लिपि नाही हया अभ्यासाच्या अडचणी सांगत डॉ. तायडे यांनी आपल्या जिज्ञासेतून कोरकूंची जीवनसंस्कृती व लोकसाहित्य समजून घेतले. हे निश्चितच गौरवास्पद आहे.

डॉ. विलास तायडे यांनी कोरकूंची 'सार्वजनिकसेवा, विकास व राहणीमान' अशी त्रिसूत्रात्मक व्यापकदृष्टी समोर ठेवून मेळघाटातील कोरकूंची जीवनसंस्कृती आणि लोकसाहित्य हा संशोधकीय प्रकल्प विद्यापीठात सादर करुन पूर्ण केला आहे.

झारखंड राज्यात वस्तिस असलेले 'कोल किंवा मुंण्डा' जमातीतील काही कुटूंबांनी स्थानांतर केली आणि अमरावतीच्या मेळघाट क्षेत्रात स्थायिक झाले. स्थायिक आणि स्थानांतरीत समूहाची भाषा एकच आहे. ती आस्ट्रिक भाषा समूहातील आहे.

'कोल' शब्दांचा मुण्डारी भाषेत 'मानवाचा समूह' असा अर्थ होतो. कालांतराने कोल पासून 'कोर' हा अपभ्रंश शब्द तयार झाला. या विखुरलेल्या समूहांना एका सूत्रात बांधायचे काम त्यांची भाषाच करते. या आदिम समूहांची भाषा बऱ्याच प्रमाणात स्थिर आहे.

ब्रिटीशांच्या जनगणनेनुसार आदिवासींच्या धर्माची नोंद वेगळी असली तरी हिंदू व्यवस्थेची संरचना आणि धार्मिकता सारखी आहे. कोरकू हे आत्म्यावर विश्वास ठेवतात. त्यांची नैतिकमूल्ये आणि व्यावहारिक आदर्श हिंदू आत्मवादाशी संबंधित आहेत.

कोरकू स्वत:ला कौरव वंशीय समजतात आणि रावण व रावणपूत्र मेघनाथाचे भक्त समजतात. असे असले तरी हिंदूधर्मीयाप्रमाणे रावण दहन करतात.

कोरकूंचे आर्थिक जीवन बऱ्याच अंशी आदिम स्वरूपाचे आहे. कोरकूंच्या आर्थिक क्रिया निसर्गावर आश्रीत आहेत. कोरकू ही भटकी जमात असल्याने त्यांच्या आर्थिक क्रिया वन व वनसंपदेशी संबंधित आहेत. उदर निर्वाहाची साधने गोळा करण्यासाठी त्यांना कठोर परिश्रम करावे लागतात. त्यांचे आर्थिक जीवन अधिकच संघर्षमय आहे. आदिवासी हे दुर्गम किंवा जंगली क्षेत्रात निवास करीत असल्यामुळे मूलभूत सुविधा व नियोजनाच्या अभावामुळे त्यांचे शारीरिक आणि शैक्षणिक कुपोषण होत आहे. शिक्षण - आरोग्य - दळणवळण या उपलब्ध सेवा तुटपूंज्या असल्यामुळे आदिवासी कोरकू समाज विकसित नाही.

कोरकूंच्या धर्मकार्यात-सणउत्सवात भूमकाची भूमिका महत्वाची असते. भूमकाचे पद अनुवंशीक आहे. कोरकूंच्या सणोत्सवात मुख्य सण 'होळी' या सणाला ते नाचगाणे करतात व फगवा मागतात.

''मुर्गा होय तो ठैरौ, मुर्गी होय तो भागो
जाँब की जडीयॉवाले, ठैरो मैरे साले ।''

या गाण्यातील प्रासंगिकता मोठी विलोभनीय असते. तरुण-तरुणी साथीदार निवडून लग्नही करतात. त्यांच्या सण-उत्सवात 'नाच-गाणे' अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. नाच गाणे - रांडभावे, झुला नाचो, डंडा नाचो, होरीयार नाचो, गोल नाचो, खंब नाचो, खडा नाचो, गदली नाचो इत्यादी. त्यांचे नाच गाणे लोकांसाठी नसून स्वत:च्या आनंदासाठी असते. मृतव्यक्तीच्या स्मरणार्थ कुलचिन्हांच्या लाकडाचा खांब वेशीवर स्थापित करतात. गाथा उत्सवात सर्व मृतात्मे भेटीला येतात आणि आपल्याला आशीर्वाद देतात. अशी कोरकूंची श्रध्दा आहे. या प्रसंगी रात्रभर गाणी

म्हटली जातात. वंशवृध्दी करणे हा या गाण्याचा उद्देश असतो.

कोरकूंची गाणी ही आशयाची आणि शब्दांची आवर्तने गिरविणारी आहेत. ऱ्हिदम कायम ठेवण्यासाठी ही आवर्तने अनिवार्य ठरतात. गाण्यातील मौखिक सूर, ताल, लय प्रत्यक्षात ऐकण्याचीच बाब आहे. परक्या भाषेतील शब्दांना पचवूनही ते आपल्या सांस्कृतिक संचिताचे पर्याय मात्र कदापिही स्वीकारत नाही. उदा. मराठीत गाणी तर कोरकू मध्ये सिरींज म्हणतात.

कोरकूंच्या जीवनात लोककथेलाही महत्त्वाचे स्थान आहे. पुढची पिढी लोककथा सांगून हा वारसा चालवते. येथे कोरकू बोलीतील काही लोककथेसह संक्षिप्त आशय मराठी भाषेत दिला आहे.

बोलीवर प्रकाश टाकतांना डॉ. तायडे यांनी आपल्या लेखन प्रंपचामागील हेतू स्पष्ट केला. लोप पावत चाललेल्या आदिवासी भागाचे दस्तऐवजीकरण व्हावे व या बोलीचे अस्तित्व कायम राहावे. या प्रामाणिक उद्देशाने कोरकू बोलींचा वर्णनात्मक व समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. 'मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती' या विषयाची मांडणी संक्षिप्त असली तरी त्यांची जिज्ञासा लक्षात घेता ते कोरकूंची बोली आत्मसात करतील अशी आशा बाळगतो. त्यांची वाटचाल उज्ज्वल होवो हीच सदिच्छा!

**– डॉ. शंकर राऊत**

**आकोट**

# अभिप्राय

प्रा.डॉ. विलास तायडे यांनी 'मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती' या पुस्तकात आदिवासी जमातीतील 'कोरकू' या जमातीच्या लोकसंस्कृतीचा घेतलेला वेध लक्षणीय आहे. मध्यवर्ती मराठी साहित्याला ज्या विविध वाङ्मयीन प्रवाहांनी पुष्ट केले, त्यापैकी आदिवासी साहित्य हा एक प्रवाह आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अती दूर असलेला, दुर्गमभागात, अरण्यात राहणारा, सुधारणेचा वारा न लागलेला कोरकू आदिवासी हा समाज हजारो वर्षे वंचित, उपेक्षित राहिला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषत: १९६० नंतर असे विविध उपेक्षित समाज घटक साहित्य विषय बनले. त्यांच्या व्यथा-वेदना, संस्कृती, रूढी-परंपरा, श्रध्दा-अंधश्रध्दा, कला-साहित्य यांना शब्दरूप मिळाले. मराठीतील दमदार लेखक-कवींनी वाचकांसमोर असे अलक्षित विश्व ताकदीने उभारले. त्यापैकीच एक लेखक म्हणजे प्रा.डॉ. विलास तायडे.

प्रस्तुत लेखक दलित साहित्याचे गाढे अभ्यासक व संशोधक आहेत. दलित साहित्य हा मराठीतील प्रवाह अत्यंत ताकदवान असून त्याने एकूणच मराठी साहित्याला ढवळून काढले आहे. हे निर्विवाद सत्य आहे. प्रा.डॉ. विलास तायडे हे लेखक दलित साहित्याबरोबर आदिवासी साहित्याचाही अभ्यास करत आहेत. त्या अभ्यासातूनच या पुस्तकाची निर्मिती झाली.

विदर्भातील अमरावती जिल्हयातील मेळघाट क्षेत्रात असलेले कोरकू या आदिवासी जमातीची लोकसंस्कृती हा त्यांचा अभ्यास विषय आहे. कोरकू हे जंगलात राहत असल्यामुळे त्यांचे जीवन वन आणि वनसंपदेशी निगडित आहे. शिकार करणे, मासोळया पकडणे, वनोपज गोळा करणे, सर्पण गोळा करणे, पशुपालन करणे, कंदमुळे, फळे खाणे, आणि असलाच

शेतीचा तुकडा तर शेती करणे, मोलमजुरी करणे या भरवश्यावरच त्यांची उपजिविका चालते. त्याच्यामध्ये भयानक दारिद्रय व अज्ञान असल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना तोंड देत कसेबसे जगावे लागते. आजच्या २१ व्या शतकातही अन्न, वस्त्र, निवारा हया प्राथमिक गरजांसाठी त्यांना आपले जीवन पणाला लावावे लागते. हे भीषण वास्तव आहे. अनारोग्य, कुपोषण, अंधश्रध्दा, कर्जबाजारीपणा, व्यसनाधिनता आणि अज्ञान यामध्ये कोरकू ही जमात पूर्णपणे वेढून गेली आहे. अशातही ते आपली संस्कृती, कलापरंपरा, सण-उत्सव, पूजा अर्चा, विधी, नृत्यपरंपरा, कथा-गीते जोपासत आहेत व ते वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा त्यांच्यामधील जगण्याच्या चिवट जीद्दीचा परिचय ठरतो.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सरकारने आदिवासी समाजाच्या सुधारणेसाठी अनेक योजना आखल्या आहेत. प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, घरे, शेती, नोकऱ्यांमध्ये आरक्षण, उपयुक्त कायद्याची निर्मिती अशा बाबींवर सरकार काम करत आहे. परंतु हया सर्व योजना त्यांचेपर्यंत परिणामकारकपणे पोहचत नाहीत, हे वास्तव लेखकाने मांडले आहे. सरकारी व्यवस्थेमध्ये अथपासून इतिपर्यंत आदिवासींचे शोषण होतांना दिसते. मग ते समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील कसे? त्यासाठी सरकारने सातत्याने प्रयत्न करायला पाहिजेत. तरीही काही सेवाभावी सामाजिक संघटना, संस्था त्यांचेसाठी नि:स्वार्थ भावनेने काम करत आहेत, हेही येथे नमूद करणे गरजेचे आहे. प्रस्तुत लेखक म्हणतात, ‘आदिवासी लोकांच्या सुधारणेसाठी शासनाने व सामाजिक संघटनांनी सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे, त्यांना सर्व क्षेत्रामध्ये समावून घेणे व त्यांचा विकास घडवून आणणे ही काळाची गरज आहे. तरच ते प्रगती करू शकतील व समाजाच्या प्रवाहामध्ये सहभागी होतील.’ हा लेखकाचा निष्कर्ष म्हणूनच चिंतनीय आहे.

लेखकाने कोरकूंच्या बोली भाषेचा लोकसंस्कृती व जीवनशैलीचा जो अभ्यास केला तो सखोल असून मुळातून वाचण्यासारखा आहे. उपसंहारामध्ये त्यांनी दिलेले निष्कर्ष अभ्यासनीय आहेत. परिशिष्टामध्ये लेखकाने कोरकूंच्या एकूणच जीवन व्यवहारा विषयी दिलेली विविध छायाचित्रे त्यांच्या स्थीतीगतीवर प्रकाश टाकणारी आहेत.

जीवन प्रवाही असते. ते बदलत राहते. कोरकू सारख्या आदिवासीचे जीवनही हळूहळू का होईना बदलत आहे. लेखकाने इथेच न थांबता कोरकूंच्या बदलत्या जीवनाचा सूक्ष्मपणे वेध घ्यावा. हया त्यांच्या ग्रंथाला माझ्या मनपुर्वक शुभेच्छा.

**– प्रा. ग. रा. अंबाडकर**
**आकोट**

## मनोगत

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर अनेक साहित्यप्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये मुख्यत: दलित साहित्य, ग्रामिण साहित्य, जनसाहित्य, कामगार साहित्य, स्त्रीवादी साहित्य इ. चा उल्लेख करावा लागेल. या अनेक साहित्यप्रवाहांमध्ये त्या त्या समाजघटकांच्या वास्तवाची, त्यांच्या शोषणाची, सुखदु:खाची व संघर्ष विद्रोहाची स्वतंत्रपणे चर्चा झाली. सर्वंकष लेखनही झाले. आदिवासी जमातीतील मुख्यत्वे गोंड, कोरकू, भिल्ल या जमातीच्या लोकसंस्कृतीचा, जीवनपध्दतीचा, बोलीभाषेचा, त्यांच्या लोकसाहित्याचा स्वतंत्रपणे व सर्वंकष अभ्यास व्हायला पाहिजे होता. खरे म्हणजे आदिवासींची निसर्गनिष्ठा जीवनशैली आणि नैतिकता त्यांचा धर्म आणि श्रध्दा, त्यांच्या संस्कृतीमधील दैवते, कलापरंपरा आणि लोकसाहित्य हेच आदिवासी साहित्याचे मौलिक संचित आहे. ऐवढे मात्र निश्चित की, आदिवासी हेच मुळ निवासी आहेत. त्यांच्या संस्कृतीमधील आदिम तत्व किंवा आदिबंध हेच त्यांच्या संस्कृतीचे वेगळेपण आहे. त्यामुळे आदिवासींचा आदिम इतिहास हा केवळ त्यांच्या अभिनिवेषाचा विषय नसून आदिवासी साहित्यामागील मूलभूत वास्तवता महत्वाची आहे. म्हणून मी मेळघाट परिसरातील कोरकू या आदिवासी जमातीच्या जीवनसंस्कृतीचा व लोकसाहित्याचा अभ्यास असा विषय लघुशोध प्रकल्पाकरिता घेतला होता व तो पुर्णत्वास नेला.

आदिवासी हा या देशाचा मूळ निवासी आहे. मूळ निवासिंना जात नसते. थोडया बहुत फरकाने त्यांच्या वेगवेगळया जमाती (Tribes) असतात. वेगवेगळया विशिष्ट भूप्रदेशातील डोंगरदऱ्यात आदिवासी आपल्या भाषा आणि जीवनशैली जपून आहेत. मेळघाट म्हटले की प्रामुख्याने कोरकू

जमात नि कोरकू भाषा. आदिम संस्कृतीचा कणा असणारा हा आदिवासी समाज आज सर्वच क्षेत्रात मागासलेला आहे. साहित्याच्या प्रवाहापासून दूर आहे. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय दृष्टीने तो अत्यंत मागासलेला आहे. मराठी साहित्यात गोंड, कोरकू, भिल्ल, वारली, पावर, धनका, आंध, परधान, हलबा, इलबी इत्यादी जमातींच्या लोकसाहित्याचा, लोकसंस्कृतीचा, त्यांच्या परंपरेचा, मौखिक साहित्याचा उल्लेख मासिके, वृत्तपत्रे व साहित्यातून आलेला आहे परंतू तो फार सीमित आहे. मराठी साहित्य आजपर्यंत या आदिवासी संस्कृतीच्या अंतरंगाला खऱ्या अर्थाने स्पर्श करू शकले नाही व त्यांना न्याय देऊ शकले नाही.

आदिवासी कोण? त्यांचा उगम, त्यांचे वसतिस्थान, जीवनसंघर्ष, जीवनपध्दती, संस्कार, लग्नव्यवस्था, जातपंचायत, मर्तिका, सणउत्सव, देवदेवता, कुलाचार, व्रतवैकल्ये आजही ते परंपरेने जतन करून आहेत. मौखिक साहित्यामध्ये देवकथा, शिकारकथा, चोरकथा, शौर्य व अद्‌भुत कथा, लग्नगीते, विधी गीते, म्हणी-वाक्प्रचार, संकेत-भाषा यांचा ठेवा आजही आदिवासी जमातीने जतन करून ठेवला आहे. आदिवासी जीवनशैली मुळातच नृत्यसंगीतप्रधान आहे. नृत्य, चित्रकला, काष्ठकला त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

आदिवासी लोकसंस्कृतीमधील लोकवैद्यक ही शाखा दुर्लक्षित आहे. वनऔषधिंची आपण अवहेलना करतो. कालचा आजीबाईचा बटवा आपण केव्हाच गमावला. तसाच आपला हा वैद्यकीय वारसा जाऊ नये, हाही या संशोधनाचा उद्देश होता. आदिवासी वाङ्मयाची मौखिक परंपरा, आदिवासी स्त्रीयांची सौंदर्यसाधना, आदिवासीच्या विविध नृत्य आणि संगीताच्या तऱ्हांचा अभ्यास करण्याकडे आणि अनुभवातून शास्त्रीय माहिती देण्याकडे आपण वळणे आवश्यक आहे.

या आदिवासी जमातीच्या जीवनसंस्कृतीला मौखिक साहित्याला व भाषेला उजाळा मिळावा यासाठी मी मेळघाटातील कोरकू ही आदिवासी जमात अभ्यासाला घेतली आहे. सातपुडयातील मेळघाट परिसरात कोरकू जमात बहूसंख्येने आहे. कोरकू जमातीचे लोक मोलमजूरी करून उदरनिर्वाह करतात. या कोरकूंच्या जीवनसंस्कृतीचा, लोकसाहित्याचा समाजाला

परिचय व्हावा, या उद्देशाने 'मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती' असा विषय घेऊन तो पुस्तकरूपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासात मला प्राचार्य डॉ. ए. एल. कुलट, प्राचार्य डॉ. सुभाष खंडारे, प्राचार्य डॉ. शंकर राऊत, प्रा. ग. रा. अंबाडकर, प्रा. डॉ. अशोक इंगळे, प्रा.डॉ. भाष्कर पाटील, प्रा.डॉ.काशीनाथ बऱ्हाटे, प्रा.डॉ.श्रीकृष्ण काकडे, डॉ. पंजाब पुंडकर, डॉ. अनंत सिरसाट, डॉ. रविकांत महिंदकर, श्रीधरराव तायडे, सुखदेवराव वानखडे, प्रकाश तायडे यांचे सहकार्य लाभले. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

या ग्रंथाला सुप्रसिध्द चित्रकार बळी खैरे यांनी आकर्षक व कलात्मक मुखपृष्ठ तयार करून दिले. त्याबद्दल त्याचे मनपुर्वक आभार मानतो.

या ग्रंथ संकलानाच्या कामामध्ये माझी अर्धांगिनी सौ.सुरेखा चे खूप सहकार्य लाभले.

प्रशांत पब्लिकेशनचे संचालक श्री रंगराव पाटील व प्रदिप पाटील यांनी अल्पावधीत अतिशय सुबक छपाई करून ग्रंथ प्रकाशित व्हावा म्हणून बहुमोल सहकार्य केले. प्रविण राऊत यांनी सुंदर अक्षरजुळवणी केली. त्याबद्दल त्यांचे मनपुर्वक आभार मानतो. माझ्या या ग्रंथाचे वाचक, अभ्यासक आणि समीक्षक निश्चितच स्वागत करतील असा मला विश्वास आहे.

**– प्रा. डॉ. विलास तायडे**

# अनुक्रमणिका

**१. मेळघाटातील कोरकूंची जीवनशैली व संस्कृती** .................. १९

» मेळघाटातील कोरकू जमात.

» आदिवासी जमातीतील कोरकूंचे स्थान.

» कोरकू जमातीची धार्मिक व आर्थिक व्यवस्था.

» शैक्षणिक व वैद्यकीय व्यवस्था

**२. मेळघाटातील कोरकूंच्या कलापरंपरा** .............................. ३३

» कोरकूंचे सण-उत्सव, विधी व कला.

» कोरकूंच्या नृत्यपरंपरा.

» कोरकूंची लोकसंगीत परंपरा.

**३. मेळघाटातील कोरकूंचे लोकसाहित्य**.............................. ४१

» कोरकूंच्या लोककथा.

» कोरकूंच्या दैवतकथा.

» कोरकूंची लोकगीते.

**४. मेळघाटातील कोरकूंची भाषा**....................................... ६१

» कोरकूंची बोली.

» कोरकूंच्या बोलीचा अभ्यास.

» कोरकूंच्या बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्द.

» कोरकूंच्या बोलीतील म्हणी-वाक्प्रचार.

**५. उपसंहार** ........................................................... ६९

प्रकरणांच्या आधारे काढण्यात आलेले निष्कर्ष.

**परिशिष्ट** .......................................................७२

**परिशिष्ट १**

- » छायाचित्रे - कोरकूंचे देवस्थान, देव-देवतांची छायाचित्रे, कोरकू नृत्य, लग्नसमारंभ, सण-उत्सव, दैनंदिन कामकाज, कोरकूंचे अलंकार, वाद्यांची छायाचित्रे.
- » मासिके व नियतकालिके
- » संदर्भ ग्रंथसूची

**परिशिष्ट २**

- » नियतकालिके - अनियतकालिक
- » कोशवाङ्मय

**संदर्भ ग्रंथसूची** ..................................................७८